विशेष व्याघ्र संरक्षण प्रकल्पांतर्गत वननिरीक्षक
(Forest Watchers) संवर्गातील पद भरतीबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.:- एफएसटी-१२/ १५/प्र. क्र.५६४/फ - ४
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ६ जानेवारी, २०१६.

वाचा :- १) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-२२(४)/ आस्था/प्र.क्र. ८८/३८१२/२०१५-१६, दि. २३.१२.२०१५.
२) शासन अधिसुचना क्र. एफएसटी/०२/०९/प्र.क्र.८६/फ-४, दि. ३०/०६/२०११.
३) शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. एफएसटी ०७/११/प्र.क्र. २८७/फ - ४, दि. ३०/०७/२०११.
४) शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. एफएसटी ०७/११/प्र.क्र. २८७/फ - ४, दि. २२/०८/२०१२.
५) शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र.एफएसटी ०७/१३/प्र.क्र.३२५/फ-४, दि. २८/११/२०१३.
६) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/ १३-अ, दि.५/०६/२०१४.
७) शासन महसूल व वन विभाग,पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र. २८७/फ-४ दि. २१.०७.२०१४
८) शासन पत्र क्र. महसूल व वनविभाग क्र. एफडीएम - १२/१५/प्र.क्र. ५५०/फ - ४, दि. ०५/१२/२०१५,

प्रस्तावना:-

वन विभागातील वनरक्षक संवर्गातील भरती संदर्भातील सेवाप्रवेश नियम सदर्भ क्रमांक २ येथे नमूद दि. ३०.०६.२०११ रोजीच्या आधिसुचनेनुसार निश्चित करण्यात आले आहेत. तसेच या संवर्गातील भरती प्रक्रियेची कार्यपध्दती संदर्भ क्रमांक २ येथे नमूद दिनांक ३०.०७.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये आणि सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने ठरविण्यात आली आहे. वनरक्षक (गट-क) पदावरील व्यक्तीस वन, वन्यजीव, जैवविविधता यांचे संरक्षण आणि संवर्धन व राज्यातील खाजगी, पडिक व सामूहिक जमिनीवर वृक्ष आवरण वाढविणे इत्यादी संदर्भातील कामे अत्यंत कठीण परिस्थितीत करावी लागतात. या विशिष्ट आणि वेगळया स्वरुपाच्या जबाबदाऱ्या लक्षात घेवून वनरक्षक आणि तत्सम संवर्गातील भरतीची कार्यपध्दती इतर विभागातील समकक्ष संर्वगापेक्षा वेगळी अशी ठेवण्यात आली आहे.

त्यानंतर संदर्भ क्रमांक ४ येथे नमूद दि, २२.०८.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये धावण्याची चाळणी परीक्षा आणि शारिरीक चाचणी या संदर्भातील तरतूदीमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

संदर्भ क्रमांक ५ येथे नमूद दि.२८.११.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवेंगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातंर्गत स्थापित झालेल्या विशेष व्याघ्र संरक्षण दलामधील (Special Tiger Protection Force) वन निरिक्षक-गट-क (Forest Watchers-Group-C) या पदांची मान्यता आणि भरती कार्यपध्दती

विहित करण्यात आली आहे. वन निरिक्षक या पदावरील कर्मचाऱ्यांना कामाच्या आवश्यकतेनुसार प्रसंगी २४ तास जंगलामध्ये गस्त घालून वाघ आणि इतर वन्य प्राण्यांच्या संरक्षण आणि संवर्धनाची जबाबदारी अत्यंत अवघड व प्रतिकूल परिस्थितीत पार पाडावी लागते. त्यानुसार वनरक्षक पदाचे संदर्भ क्रमांक २ येथे नमूद दि. ३०.०६.२०११ रोजीचे सेवा प्रवेश नियम, संदर्भ क्रमांक ३ व ४ येथे नमूद दि. ३०.०७.२०११ आणि २२.०८.२०१२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदी शैक्षणिक अर्हता वगळता, वन निरिक्षक पदांच्या भरती प्रक्रियेसाठी लागू करण्यात आल्या आहेत.

वर नमूद दिनांक २८.११.२०१३ रोजीच्या शासन निर्णयामधील मुद्दा क्र. ४ नुसार वन निरिक्षक संवर्गातील पदे विशेष व्याघ्र संरक्षण दल कार्यरत असलेल्या व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील (Core) व बफर क्षेत्रात येणाऱ्या गावामधील रहिवासी उमेदवार तसेच या व्याघ्र प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या गावातील रहिवाशी उमेदवार यामधून भरण्यात येतील अशी तरतूद आहे. तसेच याच शासन निर्णयातील मुद्दा क्र.५ नुसार वर नमूद उमेदवारांमधून पदे भरताना प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहील अशीही तरतूद करण्यात आली आहे:-

१. प्रथम प्राधान्यक्रम :- व्याघ्र प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या गावांमधील उमेदवार.

२. द्वितीय प्राधान्यक्रम :- व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील गावांमधील रहिवासी असलेले उमेदवार.

३. तृतीय प्राधान्यक्रम :- व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावांमधील रहिवासी असलेले उमेदवार.

संदर्भ क्रमांक ६ येथे नमूद, दि. ५.०६.२०१४ रोजीच्या सा.प्र.विभागाच्या शासन निर्णयानुसार गट-क तसेच गट-ब (अराजपत्रित) मधील कोणत्याही पदासाठी उमेदवारांची निवड करताना मुलाखती घेवू नयेत अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार वनरक्षक व समकक्ष संवर्गातील भरती प्रक्रिया राबविताना पूर्वी मुलाखती साठी जे १२.५ टक्के भारांकन होते, त्याऐवजी संदर्भ क्रमांक ७ येथे नमूद दिनांक २१.०७.२०१४ रोजीच्या पत्रान्वये धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये खालील प्रमाणे गुण देण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे:-

१. पहिल्या येणाऱ्या ३ उमेदवारास (क्र. १ ते ३ वरील) यांना प्रत्येकी	- १० गुण
२. त्यांनतर येणाऱ्या ५ उमेदवारास (क्र. ४ ते ८ वरील) यांना प्रत्येकी	- ८ गुण
३. त्यांनतर येणाऱ्या ७ उमेदवारास (क्र. ९ ते १५ वरील) यांना प्रत्येकी	- ६ गुण
४. त्यांनतर येणाऱ्या १० उमेदवारास (क्र. १६ ते २५ वरील) यांना प्रत्येकी	- ४ गुण
५. त्यांनतर येणाऱ्या १५ उमेदवारास (क्र. २६ ते ४० वरील) यांना प्रत्येकी	- २.५ गुण

शारिरीक दृष्टीने सुदृढतेचा निकष विचारात घेवून आणि धावण्याच्या स्पर्धा परिक्षेमध्ये भरावयाची एकूण पदांची संख्या लक्षात घेऊन, प्रथम ४० क्रमांकापर्यंतच्या उमेदवारांना प्रवर्गाचा विचार न करता सर्वांना समान संधी देऊन त्यांचे कामगिरीनुसार धावण्याचे गुण देण्याची तरतूद वर नमूद केल्याप्रमाणे केली आहे. जेणेकरुन वनरक्षक आणि वन निरिक्षक या पदांच्या विशिष्ट जबाबदाऱ्या लक्षात घेवून केवळ शारिरीक दृष्टया सुदृढ उमेदवारांची निवड करणे शक्य होईल.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक १ येथे नमूद दि. २३.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिनांक २८.११ .२०१३ रोजीच्या शासन निर्णयातील कोअर, पुर्नवसित आणी बफर क्षेत्रातील उमेदवारांचा प्राधान्यक्रम ठरवितांना दिलेल्या तरतूदींबाबत संदिग्धता असल्याने त्याबाबत अधिक स्पष्ट आदेश निर्गमित करण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने उमेदवारांच्या धावण्याच्या चाचणी परीक्षेनंतर तयार करावयाच्या प्रवर्गनिहाय लघू यादीकरीता (एकास तीन उमेदवारांकरीता) विशेष व्याघ्र संरक्षण दलातंर्गत वन निरिक्षकांची पदे भरतांना खालीलप्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात यावे असे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी प्रस्तावित केले आहे.

अ) व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर (Core) क्षेत्रातील पुर्नवसित रहिवासी उमेदवार - ०७ गुण
ब) व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर (Core) क्षेत्रातील रहिवासी उमेदवार - ०४ गुण
क) बफर क्षेत्रात येणाऱ्या गावांमधील रहिवासी उमेदवार - ०२ गुण

त्यानुसार प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याअनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय:-

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे या संदर्भातील सविस्तर पार्श्वभूमी विचारात घेवून आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे उमेदवारांच्या धावण्याच्या चाचणी परीक्षेनंतर तयार करावयाच्या प्रवर्गनिहाय लघू यादीकरीता (एकास तीन उमेदवारांकरीता) विशेष व्याघ्र संरक्षण दलातंर्गत वन निरिक्षकांची पदे भरतांना खालीलप्रमाणे अतिरिक्त गुण देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

अ) व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर (Core) क्षेत्रातील पुर्नवसीत रहिवासी उमेदवार - ०७ गुण
ब) व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर (Core) क्षेत्रातील रहिवासी उमेदवार - ०४ गुण
क) बफर क्षेत्रात येणाऱ्या गावांमधील रहिवासी उमेदवार - ०२ गुण

त्याचप्रमाणे अंतिम निवड यादी तयार करतांना कोअर क्षेत्रातील पुनर्वसित, कोअर क्षेत्रातील रहिवासी आणि बफर क्षेत्रात येणाऱ्या गावांमधील रहिवासी उमेदवार यांना प्रचलित भरती प्रक्रियेतील कार्यपध्दतीनुसार १० वी मधील गुणांचे ८७.५० टक्के इतके भारांकन देण्यात येईल. याव्यतिरिक्त उर्वरित १२.५० टक्के भारांकनाकरीता धावण्याच्या चाळणी परिक्षेमध्ये देण्यात येणारे गुण आणि वरील प्राथन्यक्रमानुसार येणारे गुणांचे एकत्रित १२.५० टक्के भारांकन देण्यात येईल. अशारीतीने अंतिम गुणांकाच्या आधारे अंतिम निवडसूची तयार करण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता देण्यात येत आहे.

तरी वन निरिक्षक पदांची भरती करताना वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेबाबतच्या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०६१७३२५३७७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2016.01.06 17:56:20 +05'30'

(डी. एल. थोरात)
सहसचिव (वने)

प्रति :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित, नागपूर
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
६. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)
७. मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) (सर्व)
८. प्रकल्प संचालक, नवेंगाव-नागझिरा, व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदीया
९. प्रकल्प संचालक, सर्व व्याघ्र प्रकल्प, महाराष्ट्र राज्य.